POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०५ ● मुंबई, रविवार, ०७ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना मुंढेंचा दणका



अन्न व औषध प्रशासन अर्थात 'एफडीए'चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे.

5 दिवसात 2 कोटींचा माल जप्त

192 आरोपींना अटक

दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने भेसळखोरांवर लक्ष ठेवण्यासाठी विविध पथके तैनात करण्यात आली आहेत. ही तपासणी सुरू राहील असा इशारा देण्यात आला आहे. नागरिक तसेच ग्राहकांची काही तक्रार असल्यास १८००२२२३६५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन सह आयुक्त दि. ज्ञा. तांबोळी यांनी केले आहे.



प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाची राज्यव्यापी धडक कारवाई सुरुच आहे. 1 जून ते 5 जून 2026 या पाच दिवसांत राज्यभर 195 धाडी टाकल्या आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाची राज्यव्यापी धडक कारवाई सुरुच आहे. 1 जून ते 5 जून 2026 या पाच दिवसांत राज्यभर 195 धाडी टाकल्या आहेत. या कारवाईदरम्यान 192 आरोपींना अटक करण्यात आली आहे. तब्बल 1 कोटी 99 लाख 18 हजार 475 किमतीचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत 123 ॠक्षक दाखल झाले आहेत. तुकाराम मुंढे यांच्या निदेर्शानुसार राज्यभर विशेष धाडसत्र सुरु आहे.

अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्याचा इशारा

धाराशिव जिल्ह्यातील परंडा इथं 1 कोटी 2 लाख 67 हजार 263 किंमतीचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी 2 जणांना अटक केली आहे. तर समृद्धी महामार्गावरील सावंगी टोल नाक्यावर 60 लाख 50 हजार किमतीचा माल आणि वाहन जप्त केली आहेत. धुळे जिल्ह्यातील सोनगीर येथे 23 लाक 50 हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. नांदेडच्या महाराष्ट्र-तेलंगणा सीमाभागात 17 लाख 52 हजार किंमतीचा माल व वाहन जप्त करण्यात आले आहे. पुण्यातील मोशी येथे 6.19 लाखांचा माल जप्त केला आहे. तर 6 जणांविरोधात ॠक्षक दाखल केले आहे. राज्यातील अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. बृहन्मुंबई विभागात 30 धाडी टाकण्यात आल्या आहेत. याप्रकरणी 30 जणांना अटक करण्यात आली आहे. कोकण विभागात सर्वाधिक 79 धाडी टाकल्या आहेत. तर 78 जणांना अटक करण्यात आली आहे. पुणे विभागात 52 धाडी तर 52 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

प्रतिबंधित अन्नपदार्थ जप्ती मोहीम
(1 जून 2026 ते 5 जून 2026)

- **बृहन्मुंबई**
  - धाडी - 30
  - जप्त साठा - ₹. 3,42,055
  - ॠक्षक- 15
  - अटक - 30
- **कोकण**
  - धाडी - 79
  - जप्त साठा - 8,19,618
  - ॠक्षक- 34
  - अटक - 78
- **पुणे**
  - धाडी - 52
  - जप्त साठा - ₹.15,10,455
  - ॠक्षक- 41
  - अटक - 52
- **नाशिक**
  - धाडी - 8
  - जप्त साठा - ₹.35,56,830
  - ॠक्षक- 8
  - अटक - 8
- **छत्रपती संभाजीनगर**
  - धाडी - 9
  - जप्त साठा - ₹.1,15,64,533
  - ॠक्षक- 8
  - अटक - 8
- **नागपूर**
  - धाडी - 15
  - जप्त साठा - ₹.12,29,728
  - ॠक्षक- 15
  - अटक - 15
- **अमरावती**
  - धाडी - 2
  - जप्त साठा - ₹.8,95,256
  - ॠक्षक- 2
  - अटक - 1
- **एकूण**
  - धाडी - 195
  - जप्त साठा - 1,99,18,475
  - ॠक्षक- 123
  - अटक - 192

मुंबई, भिवंडीत छापे, 2 कोर्टींचा माल जप्त...



तुकाराम मुंढेंनी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्तपद स्वीकारल्यापासून सुरु असलेला कारवाई आणि छापेमारीचा धडाका सुरुच आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखाली धडक कारवाईचं सत्र सुरुच आहे. मुंबई, भिवंडी आणि पालघर येथे कारवाई करताना अन्न व औषध प्रशासनाने सुमारे 2 कोटी 17 लाख रुपयांच्या वैद्यकीय उपकरणे व औषधसाठ्यावर कारवाई केली. या बेकायदा साठवणूक, उत्पादन प्रक्रियेतील गंभीर त्रुटी आणि निकृष्ट दर्जाच्या वैद्यकीय साहित्याच्या पुरवठ्याचे प्रकार उघडकीस आला. मुंढे यांनी निर्देश दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

साकीनाक्यात छापा अन् भिवंडीतील उत्पादन बंद

मुंबईतील साकीनाका येथे विनापरवाना विक्रीसाठी साठवून ठेवलेले 74.85 लाख रुपयांचे सर्जिकल ग्लोव्हज जप्त करण्यात आले. संस्थेने परदेशातून आयात केलेले ग्लोव्हज आवश्यक नोंदणी व परवानगीशिवाय विक्रीसाठी ठेवले असल्याचे तपासात आढळून आले. मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांना येथून वितरण झाल्याचे समोर आले आहे. कारखान्याच्या तपासणीत गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली, मानक कार्यपद्धती आणि अन्य आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्याने 9.88 लाख रुपयांच्या सर्जिकल ग्लोव्हजच्या साठ्यावर प्रतिबंध घालण्यात आला असून, भिवंडीतील उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सर्जिकल बॅण्डेजही जप्त

वाडा येथील मेडिकल डिव्हाइस उत्पादन कारखान्यावर टाकलेल्या छाप्यात 1.26 कोटी रुपयांचे सर्जिकल बॅण्डेज साहित्य प्रतिबंधित करण्यात आले. तसेच कारखान्यात निजंर्तुकीकरण प्रक्रिया पूर्ण न करता 'स्टेराइल' म्हणून साहित्याचा पुरवठा केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात 'नॉन-स्टेराइल' बॅण्डेज क्लॉथ, रोल्ड बॅण्डेज आणि कॉटन गाँजचा साठाही आढळून आला. एफडीएने या कारवाईत 6.17 लाख रुपयांचा विनापरवाना ॲलोपॅथिक औषधसाठाही जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे 81 लाख रुपयांची औषधे व सर्जिकल साहित्य जप्त करण्यात आले, तर 1 कोटी 35 लाख रुपयांचा साठा गुणवत्ता चाचणीसाठी प्रतिबंधित करण्यात आला आहे.

पुण्यातही धडक कारवाई

चार दिवसांपूर्वीच पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव आणि खेड तालुक्यात अन्न व औषध प्रशासनाने 5 ठिकाणी धडक कारवाई केली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या विशेष मोहिमेत तब्बल 19 लाख 3 हजार 379 रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. मंचर येथे प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, विनापरवाना चालणाऱ्या 'खेमराज फूड इंडस्ट्रीज'मधून साडेदहा लाखांचा मैदा, बेसन आणि पीठाचा साठा जप्त करण्यात आला. दुसरीकडे, खेड तालुक्यातील भांबुरवाडी येथील 'उज्वल सुपारी' या विनापरवाना दुकानातून 8 लाख 16 हजारांची संशयास्पद सुपारी जप्त करण्यात आली, तर नरे येथील 'ओम साई फरसाण'मध्ये हिरव्या वाटाण्यासाठी घातक कृत्रिम रंग वापरल्याचे समोर आले आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि भेसळ करणाऱ्यांवर अशीच कडक कारवाई सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला असून, नागरिकांनी अशा बेकायदेशीर गोष्टींची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

एफडीएचे २०३ आस्थापनांवर छापे, १०२ जणांना अटक

मुंढे यांची अवैध गुटखा व भेसळीविरोधात कारवाई



■मुंबई। प्रतिनिधी,

अन्न व औषध प्रशासन अर्थात 'एफडीए'चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. २५ ते ३१ मे २०२६ दरम्यान ह्याएफडीएह्मने केलेल्या धडक कारवाईत राज्यात एकूण २०३ आस्थापनांवर छापे टाकण्यात आले असून याप्रकरणी १०२ जणांना अटक करण्यात आली आहे.

या मोहिमेत ८६ प्रतिष्ठाने सील करण्यात आली असून १ कोटी ५८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. 'सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध आणि सुरक्षित महाराष्ट्र' या अभियानांतर्गत ही धडक मोहीम राबवण्यात आली आहे.

'एफडीए'ने दिलेल्या माहितीनुसार मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागांत प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रेते तसेच उत्पादकांवर छापे टाकण्यात आले. यामध्ये कोकण विभागात सर्वाधिक कारवाई करत ४७ प्रतिष्ठानांवर छापे टाकून ४६ जणांना अटक करण्यात आली. मुंबईत २२ ठिकाणी कारवाई करून २३ जणांना तर पुण्यात १४ आस्थापनांवर छापे टाकून १३ जणांना अटक करण्यात आली.

याशिवाय नाशिकमध्ये पाच छापे आणि पाच अटक, छत्रपती संभाजीनगरमध्ये आठ छापे आणि आठ अटक, अमरावतीत पाच आस्थापनांवर कारवाई करत पाच जणांना तर नागपूर विभागात दोन ठिकाणी छापे टाकून दोन जणांना अटक करण्यात आली. या कारवाईदरम्यान भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४ आणि २७५ सह अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून ३४ लाख ५ हजार रुपयांचा गुटखा आणि पानमसाला जप्त करण्यात आला आहे.

भेसळयुक्त अन्नपदार्थांची तपासणी

राज्यभरातील मोहिमेसोबतच मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, जालना, बीड, सोलापूर, नांदेड, परभणी, रायगड, धुळे आणि इतर जिल्ह्यांमध्ये भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात तपासणी करण्यात आली. या मोहिमेत एकूण ७३ अन्न प्रतिष्ठानांची तपासणी करण्यात आली असून आंबे, दुग्धजन्य पदार्थ, खवा, बेकरी उत्पादने, आईस्क्रीम, खाद्यतेल, मसाले, मिठाई यासारख्या १ कोटी २४ लाख रुपये किमतीचा सुमारे ९० हजार ६३९ किलो संशयास्पद अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

नागरिकांना तक्रार करण्याचे आवाहन

नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असे सांगत अन्न भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई सुरूच राहील, असा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. तसेच नागरिकांनी भेसळ किंवा अवैध विक्रीबाबत विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

खरीपच्या तोंडावर मोठा घोटाळा उघड!

जामनेरमध्ये बनावट कापूस बियाण्यांचा साठा जप्त



■जळगाव। प्रतिनिधी,

जळगाव जिल्ह्यात खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा मोठा डाव उधळून लावण्यात आला आहे. जामनेर तालुक्यात पोलिसांनी धडक कारवाई करत अनधिकृतरीत्या साठवून ठेवलेल्या कापूस बियाण्यांच्या मोठ्या साठ्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ९ लाख १५ हजार ४१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बनावट कापूस बियाण्यांचा साठा जप्त

जामनेर शहरातील साईनगर परिसरात मोठ्या प्रमाणावर संशयास्पद कापूस बियाण्यांचा साठा केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त कारवाई करत दीपक राजमल चौधरी यांच्या घरावर छापा टाकला. छाप्यात घरामध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस बियाण्यांचा साठा आढळून आला.

तपासादरम्यान ४० गोण्या आणि तब्बल १ हजार १६ बियाण्यांची पॅकेट्स जप्त करण्यात आली. या पॅकेट्सवर विविध कंपन्यांची नावे, बॅच क्रमांक आणि उत्पादनासंबंधी माहिती नमूद करण्यात आली होती. मात्र संबंधितांकडे बियाण्यांची विक्री, साठवणूक आणि वितरणासाठी आवश्यक असलेला कोणताही वैध परवाना किंवा अधिकृत कागदपत्रे नसल्याचं तपासात उघड झालं.

पुरवठादार कोण ?

याशिवाय, जप्त बियाण्यांची खरेदी कुठून करण्यात आली? पुरवठादार कोण होता? आणि ही बियाणे अधिकृतरीत्या विक्रीसाठी मंजूर होती का? याबाबतही समाधानकारक माहिती संशयितांकडून देण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकरणामागे मोठं अवैध वितरण जाळं कार्यरत असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. जप्त बियाण्यांमध्ये 'दिया-५९' वाणाची ४५० पॅकेट्स आणि 'क्रीश-४५' वाणाची ५६६ पॅकेट्स असल्याचं समोर आलं आहे. पंचनाम्यानुसार या सर्व साठ्याची किंमत ९ लाखांहून अधिक असल्याचं स्पष्ट झालं आहे.

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे की, अशा प्रकारची अनधिकृत किंवा बनावट बियाणे बाजारात पोहोचल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसू शकतो. कमी उगवण क्षमता, उत्पादनात घट, पीक नुकसान आणि मोठं आर्थिक नुकसान अशा संकटांना शेतकऱ्यांना सामोरं जावं लागू शकतं. विशेषतः कापूस हे जळगाव जिल्ह्यातील महत्त्वाचं नगदी पीक असल्याने हा प्रकार गंभीर मानला जात आहे.

अहवालानंतर मोठे खुलासे होणार ?

या प्रकरणी पंचायत समितीच्या कृषी विकास अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून दीपक राजमल चौधरी, गुलाब आधार पाटील, शेषराव पाटील आणि इतर संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांवर शेतकऱ्यांची फसवणूक, अनधिकृत बियाणे साठवणूक आणि विक्रीचे आरोप ठेवण्यात आले असून, बीएनएस २०२३, बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियंत्रण आदेश १९८३ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सध्या जप्त बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात येणार असून, अहवालानंतर या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कोणत्या जिल्ह्यांना येलो अलर्ट?

हवामान विभागाने दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.

येलो अलर्ट असलेले जिल्हे :

पालघर, ठाणे, मुंबई (उष्ण व दमट हवामानासह पावसाची शक्यता) नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर छत्रपती संभाजीनगर, बीड बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली

मुंबईकरांना अजून थोडी प्रतीक्षा :

मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरात आज दिवसभर उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. दुपारनंतर काही भागांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. सध्या मुंबईतील कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले जात असून हवेत आर्द्रतेचे प्रमाणही वाढले आहे. मान्सूनची आतुरतेने वाट पाहणाऱ्या मुंबईकरांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र पुढील काही दिवसांत मान्सून मुंबईकडे सरकल्यानंतर वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे.

बहुतांश भागात पावसाची हजेरी :

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील वातावरणात लक्षणीय बदल जाणवत आहे. अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण, विजांचा कडकडाट आणि पूर्वमान्सूनच्या सरी कोसळत आहेत. हवामान विभागाने आज कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. पुढील चार ते पाच दिवस राज्यातील विविध भागांत मेघगर्जनेसह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता असून काही ठिकाणी मुसळधार पाऊसही होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

मान्सून महाराष्ट्राच्या दारात!

पुढील ४८ तास निर्णायक... जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांची प्रतीक्षा आता संपण्याच्या मार्गावर असून नैऋत्य मान्सून महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. केरळमध्ये ४ जून रोजी दाखल झालेल्या मान्सूनने वेगाने आगेकूच करत गोवा, कर्नाटक आणि तमिळनाडूच्या काही भागांपर्यंत मजल मारली आहे. आता पुढील ४८ तासांत मान्सून महाराष्ट्राच्या दक्षिण किनारपट्टीत प्रवेश करण्याची दाट शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

सध्या अरबी समुद्रातील अनुकूल वातावरण आणि नैऋत्य मौसमी वाऱ्यांची वाढती तीव्रता लक्षात घेता मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे दक्षिण कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांत ५ ते ११ जूनदरम्यान चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, केरळ आणि कर्नाटकमध्ये पुढील सात दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ६ आणि ७ जून रोजी केरळमधील काही भागांसाठी विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच ईशान्य भारतातील राज्यांमध्येही पुढील आठवडाभर पावसाचा जोर कायम राहणार आहे. गोव्यात मान्सूनच्या आगमनानंतर आता त्याची पुढील वाटचाल अधिक वेगाने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दक्षिण कोकण, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि कोल्हापूर परिसरात लवकरच मान्सूनच्या दमदार सरी कोसळण्याची शक्यता हवामान तज्ञांनी व्यक्त केली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

हरवलेले समाधान!


वार्षिक ४० लाख रुपयांचे उत्पन्न असलेल्या गुरुग्राममधील (हरियाणा राज्य) एका व्यक्तीला ती 'गरीब' आहे, असे वाटते. त्यामुळे तिला रात्रीची झोप लागत नाही, अशी माहिती एका आधुनिक वैद्याने अलीकडेच दिली. बी.एम.डब्ल्यू.सारखे आलिशान चारचाकी वाहन, उत्तम रहाणीमान आणि आर्थिक सुबत्ता असूनही त्या व्यक्तीला गरिबीच्या भावनेने ग्रासलेले आहे. देशातील बहुतांश नोकरदारवर्गाला 'श्रीमंत असणे' म्हणजे नेमके काय? याविषयीही मोठा संभ्रम आहे; कारण श्रीमंतीची परिमाणे अलीकडे आलिशान जीवन जगण्याकडे झुकलेली आहेत. इच्छांच्या ओज्याखाली आवश्यकतांचे समाधान हरवले की, श्रीमंती आणि गरिबी यांच्या झुल्यावर हेलकावणारी मनःस्थिती निर्माण होते. आधुनिक समाजाच्या मानसिकतेचे हे गंभीर चित्रण आहे. भारताच्या महानगरांतील लाखो युवक, व्यावसायिक, नोकरदार आणि उद्योजक याच मानसिक संघर्षातून जात आहेत. आज उत्पन्न वाढले आहे, उपभोगाच्या सुविधा वाढल्या आहेत, तंत्रज्ञानामुळे जीवन अधिक सुखकर झाले आहे; परंतु मनःशांती, समाधान आणि आत्मिक स्थैर्य कायमचे दूर गेले आहे. 'जगण्याच्या धडपडीत या तिन्ही गोष्टी आत्मसात करायला हव्यात', असे वाटत असल्याने ईर्ष्या, तुलना आणि स्पर्धा यांमुळे कृतीत न येता केवळ 'सुविचार' म्हणून सामाजिक माध्यमांत 'लाईक'पुरत्या मर्यादित रहातात. पूर्वी गरिबी, म्हणजे २ वेळचे अन्न न मिळणे, अंगावर पुरेसे वस्त्र नसणे आणि रहाण्यासाठी घर नसणे, अशी स्थिती मानली जात असे. आजही भारतात अशा प्रकारची गरिबी अस्तित्वात आहे; परंतु त्यासमवेत एक नवी गरिबी निर्माण झाली आहे, ती म्हणजे मनाने मानलेल्या गरिबीची! भारत विकसनशीलतेकडून विकासाकडे झेपावत आहे, तसा समाज आवश्यकतांकडून आलिशानतेकडे वळत आहे. आजच्या काळात एखाद्या व्यक्तीकडे घर, वाहन, शिक्षण, उत्तम वेतन आणि सर्व सुखसोयी असूनही त्याला अपूर्णत्व जाणवते; कारण त्याची तुलना स्वतःशी नसून इतरांशी होत आहे. चित्रपट, रिएॅलिटी शो यांमधील आलिशान जीवनपद्धतीची खरोखरच गरीब असलेल्या व्यक्तीलाही भुरळ पडलेली आहे. त्यामुळेच अन्न, वस्त्र, निवारा यांसह किमान ७ ते १० सहस्र रुपयांचा भ्रमणभाष प्रत्येकाकडे असतोच. खरोखर गरीब असणाऱ्यामध्ये हा पालट झाला आहे. अलीकडील विविध सर्वेक्षणांनुसार भारतातील अनुमाने ८८ टक्के शहरी नागरिक स्वतःला 'मध्यमवर्गीय' समजतात. विशेष म्हणजे उत्पन्नात मोठा भेद असूनही श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीय आणि मध्यमवर्गीय या सर्वच गटांतील लोक स्वतःला 'मध्यमवर्गीय' म्हणवून घेतात. दुर्सया एका सर्वेक्षणानुसार केवळ ३० टक्के कर्मचारी स्वतःच्या वेतनावर समाधानी आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे माणूस स्वतःची तुलना खालच्या स्तराशी न करता वरच्या स्तराशी करतो. परिणामी आर्थिक प्रगती झाली, तरी समाधानाची भावना निर्माण होत नाही. अगदी १ लाख रुपये वार्षिक कमाई असलेली व्यक्ती आणि ४० लाख रुपये वार्षिक कमाई असलेली व्यक्ती, दोन्हीही एकाच वर्गात मोडतात आणि दुसऱ्याला पाहून अधिकाधिक मिळवण्याच्या धडपडीतच तारुण्याचा मोठा काळ यात जातांना पहायला मिळतो. दुसऱ्याशी केलेल्या तुलनेमुळेच प्रत्यक्षात श्रीमंत असूनही व्यक्ती मानसिकदृष्ट्या गरीबच बनते. एकेकाळी व्यक्तीची तुलना तिच्या शेजाऱ्यांशी किंवा समाजातील काही मोजक्या लोकांशी होत असे, जी आज सामाजिक माध्यमांमुळे जगभरातील कोट्यधीश, उद्योगपती, चित्रपट कलाकार, 'इन्फ्लुएन्झर' आणि तथाकथित यशस्वी व्यक्ती यांच्याशी होऊ लागली आहे. भ्रमणभाषवर सातत्याने दिसणारे सहकाऱ्यांचे 'स्टेटस', त्यांच्या विदेशातील सहलींची छायाचित्रे, व्हिडिओ यांचा साहजिक परिणाम पहाणायावर होऊन त्याच्याही तशाच इच्छा निर्माण होतात. त्यासह स्वतः मागे पडत असल्याची भावना निर्माण होते. 'द्रष्टा दृश्यवशात् बद्धः।' या उक्तीप्रमाणे हा परिणाम होतो. सामाजिक माध्यमांवर दिसणारे जीवन हे वास्तव नसून ते वास्तवाचे 'एडिटेड' (संपादित) रूप असते. अनेक जण स्वतःचे यश दाखवतांना त्यामागचा संघर्ष लपवतात. आनंद दाखवतांना चिंता लपवतात. आलिशान जीवनपद्धत दाखवतांना त्यासाठी घेतलेली कर्जे लपलेली असतात; परंतु पहाणारा 'जगातील सर्व लोक सुखी आहेत. केवळ मी दुःखी आहे', असा समज निर्माण करून घेतो. मानसशास्त्रीय अभ्यासांनुसार सामाजिक माध्यमांवरील सततची तुलना आत्मसमाधान न्यून करते आणि अपूर्णतेची भावना वाढवते. त्यामुळे व्यक्ती स्वतःच्या यशाकडे दुर्लक्ष करून इतरांच्या यशामुळे अस्वस्थ होऊ लागते. आजची संपूर्ण अर्थव्यवस्था इच्छांची निर्मिती करण्यावर आधारित आहे. आजच्या जाहिरातींची भाषा लक्षात घेतली, तर त्यांचा मूलभूत संदेश एकच असतो, 'तुमच्याकडे जे आहे ते पुरेसे नाही.' त्यामुळे व्यक्ती सतत असमाधानी रहाते. नवीन भ्रमणभाष, नवीन वाहन, नवीन घर, नवीन 'ब्रँड' यांमागे धावते. प्रत्येक वस्तू काही काळासाठी आनंद देते; परंतु लगेचच नवीन अपेक्षा निर्माण करत असते. हाच उपभोगवाद समाधान देत नाही आणि पुरेसे नसल्याची जाणीव उत्पन्न करत रहातो. गेल्या दशकात मुंबई, देहली, गुरुग्राम, बेंगळुरू आणि भाग्यनगर (हैदराबाद) यांसारख्या महानगरांमध्ये घरांच्या किमती लोकांच्या उत्पन्नाच्या तुलनेत अधिक वेगाने वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी मध्यम आकाराच्या सदनिकेची किंमत १ ते ३ कोटी रुपयांपर्यंत पोचली आहे. त्यामुळे उच्च वेतन असलेल्या व्यक्तींनाही गृहकर्जाचे मोठे हप्ते, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि जीवनशैलीचा वाढता खर्च यांमुळे आर्थिक ताण जाणवतो. त्याचप्रमाणे महानगरांतील वाढत्या कर्जसंस्कृतीमुळे बाह्य वैभवाच्या आड अंतर्गत आर्थिक असुरक्षितता वाढत आहे. त्यामुळे आजचा प्रश्न 'आपल्याकडे किती आहे?' हा नसून 'आपल्याला किती पुरेसे वाटते?' हा आहे. आजचा भारतीय युवक संपत्ती मिळवण्याच्या शर्यतीत वेगाने धावत आहे; परंतु त्या शर्यतीची अंतिम रेषा कुठे आहे? हेच त्याला ठाऊक नाही. आधुनिक उपभोगवादी व्यवस्थेत व्यक्तीचे मूल्य तिच्या वेतनावर, घरावर, वाहनावर आणि उपभोगशक्तीवर ठरवले जाते. याउलट भारतीय संस्कृती संतोषाला, समाधानाला सर्वोच्च स्थान देते. संत तुकाराम महाराजांचे 'चित्ती असो द्यावे समाधान।' हे वचन याच जगण्याची खरी कला शिकवते. समाधान म्हणजे निष्क्रीयता नव्हे, तर प्रयत्नांनंतर मिळालेल्या फळाचा स्वीकार करणे, म्हणजे समाधान! आजच्या जगात अर्थ आणि काम यांनाच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. धर्म आणि मोक्ष या संकल्पना जीवनातून जवळजवळ नाहीशा होत आहेत. त्यामुळे पैसा मिळत आहे; पण त्याचा उपयोग कशासाठी करायचा? याचे उत्तर मिळत नाही. जीवनात खरा आनंद कशात आहे? याची शिकवणच मुळी हिंदु धर्म आणि संस्कृती देते. त्याचीच आता आवश्यकता आहे.

अन्न नासाडीपासून अन्न नेतृत्वापर्यंत मोठी संधी

दक्षिण आशिया आज आपल्या अन्नव्यवस्थेच्या प्रवासात एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. अत्यंत समृद्ध असा कृषी वारसा आणि वैविध्यामुळे, एक महत्त्वाचा कृषी प्रदेश असे स्थान मिळवूनही, दक्षिण आशियात शेतांतून ग्राहकांपर्यंत अन्नधान्य पोहचेपर्यंत त्यातील मूल्यांचे खूप मोठे नुकसान होते आहे. शेतकरी, रोजगारनिर्मिती आणि पोषणमूल्य अशा सर्वच क्षेत्रात असलेल्या क्षमतांसाठी ही एक हुकलेली संधी आहे. भारतातही याच विरोधाभासाचे प्रतिबिंब आपल्याला दिसते. जागतिक अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार, भारत जगात दूध आणि डाळींचा सर्वात मोठा तर फळे आणि भाजीपाल्याचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. मात्र तरीही, अन्नधान्याचे खूप मोठे नुकसान, पीक कापणी झाल्यानंतरची हाताळणी, साठवणूक, लॉजिस्टिक्स आणि अन्न प्रक्रिया यात असलेल्या त्रुटींमुळे तसेच, शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसह जागतिक विकासाच्या गरजांच्या प्राधान्यांनुसार प्रगती करण्याला महत्त्व न देणे, यांचाही परिणाम झाला आहे. ही केवळ अकार्यक्षमता नाही तर आपण गमावलेली संधी आहे.

अन्नधान्याचा आपण गमावलेला प्रत्येक टन, म्हणजे शेतकऱ्याचे बुडालेले उत्पन्न, युवकांचा गेलेला रोजगार आणि कुटुंबांना न मिळालेलं पोषण आहे. हे नुकसान, मूल्यात परिवर्तीत करणे, याला आता संपूर्ण प्रदेशाने प्राधान्य देण्याची गरज आहे. अन्नप्रक्रिया ही मूल्यवर्धित कृषीचे मूल्य मिळवणारी गुरुकिल्ली आहे. अन्न प्रक्रिया, शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडते, विविध कंपन्यांशी जोडते, स्थानिक उत्पादनांना प्रादेशिक आणि जागतिक मूल्य साखळीशी जोडते. अन्न प्रक्रिया कृषी आणि व्यापक वित्तीय परिवर्तनातील त्रुटी भरून त्यांना एकत्र जोडणारा पूल आहे. विपुलतेपासून मूल्यापर्यंतचा प्रवास गेल्या कित्येक दशकांपासून आपल्या कृषी धोरणाने, अन्नधान्य उत्पादन वाढवण्यावर आणि अन्नसुरक्षेवर भर दिला, जी त्या काळाची गरजच होती. या अजेंड्यानुसार काम केल्यामुळेच आपल्याला अन्नसुरक्षा साध्य करता आली. मात्र, आता त्याचा पुढचा टप्पा, मूल्य निर्मितीवर भर देणारा असायला हवा. रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पोषण मूल्यात सुधारणा करणे हा असायला हवा. भारतात, केवळ १७ टक्के कृषी उत्पादनांवर प्रक्रिया केली जाते. २०३० पर्यंत हे प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत वाढायला हवे आणि त्यात असलेल्या वित्तीय क्षमतांचा संपूर्ण लाभ त्या क्षेत्राला घेता यायला हवा. त्याचवेळी, कापणी नंतर अन्नधान्याचे नुकसान कमी करणे आणि अन्न प्रक्रिया उद्योगाची साखळी मजबूत करणे हेही अधिकाधिक मूल्य अर्थव्यवस्थेतच राहील, हे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. अन्नप्रक्रियेमुळे, अन्नधान्याच्या टिकावू क्षमतेत वाढ होते, अन्न सुरक्षा सुधारते तसेच नव्या देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांचे मार्ग खुले होतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या देशात याचे उत्पादन होत आहे, त्याच देशात, त्याचे आर्थिक मूल्य वाढल्याने, त्याचा लाभ शेतकरी, छोटे उद्योग आणि ग्रामीण समुदायाला मिळतो.

बाजारपेठप्रणित मूल्य साखळीला आकार देणे हे परिवर्तन प्रत्यक्षात आणण्यासाठी, संपूर्ण मूल्य साखळीतील प्रत्येक घटकात उत्पादन, संकलन, प्रक्रिया, लॉजिस्टिक्स आणि



शेतीपासून कंपन्यांपर्यंत आणि स्थानिक बाजारपेठांपासून जागतिक मूल्य साखळ्यांपर्यंत, अन्न प्रणालींमधील परिवर्तन हे या प्रदेशाचे आर्थिक भवितव्य निश्चित करेल. दक्षिण आशिया अन्न नासाडीकडून अन्न नेतृत्वाच्या दिशेने अग्रेसर होऊ शकते.

बाजारपेठेतील प्रवेश- योग्य समन्वय राखून नीट गुंतवणूक करणे आवश्यक असेल. यात, गुणवत्ता, सुरक्षितता, उत्पादनाचा मागोवा घेण्याची क्षमता आणि किफायतशीरपणा याविषयी ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अधिक एकात्मिक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक असेल. दक्षिण आशियातील समृद्ध कृषी वैविध्यात, उच्च मूल्यांची उत्पादने निर्मितीची क्षमता आहे, विशेषतः आज जेव्हा जगाच्या मागण्या, अधिक वैविध्यपूर्ण, पोषक मूल्यांच्या आणि विशेष अन्नधान्याच्या असताना, आपण या क्षमतांचा पुरेपूर वापर करायला हवा. त्याचवेळी, एखाद्या उत्पादनाचा मागोवा घेणे, गुणवत्ता मानके सुधारणे आणि अत्यंत गुंतगुंतीच्या जागतिक बाजारपेठांमध्ये आपली स्पर्धात्मकता वाढवणे, यासाठी डिजिटल सुविधा महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. सार्वजनिक गुंतवणुकीची भूमिका महत्त्वाची असते, परंतु तिने खासगी क्षेत्राच्या सहभागाला वेग व प्रेरणा देणे अत्यावश्यक असते. आवश्यक तेवढ्या प्रमाणात गुंतवणूक मिळवण्यासाठी, व्यवसायानुकूल वातावरण अधिक बळकट करणे, जोखीम कमी करणे आणि परिणामकारक पद्धतीने सार्वजनिक खासगी सहयोग घडवून आणणे अतिशय आवश्यक होय. भारताने यापूर्वीच सरकारच्या काही महत्त्वपूर्ण आणि सरकारला एक ओळख मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांमधून महत्त्वाची पावले उचलली आहेत. उदा. प्रधानमंत्री किसान संपदा योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग औपचारिकीकरण योजना आणि अन्नप्रक्रिया उद्योगांसाठीची उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना इत्यादी. या उपक्रमांमधून पायाभूत सुविधा बळकट होत आहेत, शीतगृह साखळ्यांचा विस्तार होत आहे आणि लघु तथा मध्यम उद्योगांना पाठबळ मिळत आहे.

यामुळे अधिक गतिशील आणि स्पर्धाक्षम अशा क्षेत्राचा पाया घातला जात आहे. अत्यंत आवश्यकता असेल तेथे रोजगारनिर्मिती अन्नप्रक्रियेचा संबंध काही फक्त आर्थिक क्षमतेशी नाही, तर उपजीविकांशीही अन्नप्रक्रिया उद्योग तितकाच संबंधित आहे. पूर्ण दक्षिण आशियाचा विचार करता, दरवर्षी कार्यबलात (वर्कफोर्समध्ये) लक्षावधी युवकांची भर पडत असते. येथून पुढे या सतत वाढत्या श्रमबळाला काम देण्यासाठी अगदी कृषी क्षेत्र झाले तरी, ते पुरेसे नाही. या प्रश्नावर उत्तम तोडगा काढण्याचे सामर्थ्य अन्नप्रक्रिया उद्योगाकडे आहे. अन्नप्रक्रिया उद्योगक्षेत्रामुळे, उत्पादन केंद्रांच्या अधिक जवळ उद्योगांची उभारणी होऊन, वाहतूक, दळणवळण, वेष्टन, अन्न तंत्रज्ञान आणि संबंधित सेवा- अशा विविध क्षेत्रांमध्ये विकेंद्रित रोजगारनिर्मिती होते. लघु तथा मध्यम उद्योगांना वाढीची संधी देत, त्यांना औपचारिक उद्योगांमध्ये रूपांतरित करत, आधुनिक मूल्य-साखळ्यांशी जोडून घेत हे क्षेत्र एक प्रकारे उद्योजकता-विकासाचा मार्गही प्रशस्त करते.

या क्षेत्राकडून मिळणारे खरे आश्वासन येथेच दडलेले आहे. केवळ अन्नाचे मूल्यवर्धन करून थांबणे हे या क्षेत्राचे कामच नव्हे, तर विशेषतः ग्रामीण भागात आणि त्यातही स्त्रिया व तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्थपूर्ण रोजगारनिर्मिती करण्याची ग्वाही हे क्षेत्र देते, ही खरी मेख आहे. परिवर्तनशील अशा जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत टिकाव धरून राहणारी भारताची प्रक्रियाकृत अन्नाची निर्यात स्थिरपणे वाढत आली आहे. जागतिक बाजारपेठेत तिच्या भूमिकेचे वाढते महत्त्वच यातून प्रतिबिंबित होते. नव्या व्यापार करारांमुळे जसजशा बाजारातील संधी निर्माण होतील, तसतसा कच्चा माल निर्यात करण्याकडून अधिक मूल्याच्या प्रक्रियाकृत उत्पादनांची निर्यात करण्याकडे कल वाढत गेला पाहिजे आणि त्यास अधिकाधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे.

दिवसेंदिवस जागतिक ग्राहकांना सुरक्षित, पोषक, सहज शोधून काढता येईल असे आणि शाश्वत/संतुलित पद्धतीने तयार केलेले अन्न हवे आहे. यामुळे तर, गुणवत्ता, मापदंड आणि नवोन्मेष यांवरील जबाबदारी अधिक वाढते आणि भारत आता या बाबतींतील क्षमतांमध्ये हळूहळू वाढ करत चालला आहे. या संधींचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी, तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा, अन्नाचा मागोवा घेणाऱ्या प्रणाली आणि ब्रँण्डिंग (नावाने प्रसिद्ध होणे) यांमध्ये गुंतवणूक होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. जागतिकदृष्ट्या स्पर्शक्षम अशा मूल्यसाखळ्या निर्माण केल्यास, उत्पादकांना आणि उद्योजकांना मूल्यसाखळीच्या वरच्या टप्प्यावर चढता येईल आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये त्यांचा ठसा उमटवता येईल. संतुलिततेचा/ शाश्वततेचा गाभा अन्नव्यवस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणायचे तर ते, शाश्वतही असले पाहिजे आणि त्यास मोठ्या आव्हानांसमोर तगही धरून राहता आले पाहिजे. जमीन, पाणी आणि ऊर्जास्रोतांवरील ताण कमी करण्यासाठीच्या उपायांमध्ये, अन्नाची नासाडी कमी करणे हा सर्वात परिणामकारक उपाय आहे. त्याचवेळी, कचऱ्यातून मौल्यवान वस्तूंची निर्मिती (टाकाऊतून टिकाऊ)- म्हणजे कृषी कचऱ्याचे नव्या उत्पादनांमध्ये रूपांतर करण्यामधील अभिनव संकल्पनांमुळे, नव्या आर्थिक संधी तर निर्माण होत आहेतच, शिवाय पर्यावरणीय परिणामही कमी होण्यास मदत होत आहे. अन्नप्रक्रिया उद्योगाची संतुलित परिसंस्थेचे काम सर्वच कसोट्यांवर मौल्यवान ठरते. अधिक चांगल्या पोषणमूल्ययुक्त पदार्थांची निर्मिती करण्यास मदत, पर्यावरणावर होणारे आहे. त्याकरिता सिद्ध होणे आता अपरिहार्य आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रशिक्षण वर्गाची उत्क्रांती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना राष्ट्रीय भावनेतून देशवासीयांचे संघटन घडवताना प्रशिक्षणाला विशेष महत्त्व देते. संघाच्या स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळातच ''संघ शिक्षा वर्ग'' सुरू करण्यात आले. त्या काळात हा प्रशिक्षण अभ्यासक्रम तीन टप्प्यांचा होता. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष. प्रथम आणि द्वितीय वर्षाचे वर्ग देशातील विविध प्रांतांमध्ये आयोजित केले जात असत, तर तृतीय वर्षाचा वर्ग संपूर्ण देशातून एकत्रितपणे केवळ नागपूर येथे घेतला जात असे. दरवर्षी उन्हाळ्यात साधारण एक महिन्याच्या कालावधीत हे वर्ग होत असत. या प्रशिक्षणात स्वयंसेवकांना संघकार्याचे सखोल आणि समग्र प्रशिक्षण दिले जात असे. या प्रक्रियेतून गेल्या शंभर वर्षांमध्ये लाखो स्वयंसेवक तयार होऊन देशभरात संघकार्यात सक्रिय झाले आहेत. काळानुसार संघाच्या रचना आणि प्रशिक्षण पद्धतींमध्ये बदल होत गेले. त्यानुसार या वर्गाची रचनाही सुधारित करण्यात आली.

सध्या प्रारंभी तीन दिवसांचा प्राथमिक परिचय वर्ग आणि त्यानंतर सात दिवसांचा प्राथमिक वर्ग घेतला जातो. हे दोन्ही वर्ग पूर्ण केलेल्या निवडक स्वयंसेवकांसाठी पुढील टप्प्यात कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्ष असे प्रशिक्षण उपलब्ध असते. प्रारंभिक, प्राथमिक आणि कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग प्रथम वर्ष हे बहुतेक प्रांत स्तरावर आयोजित केले जातात. हे साधारण २१ दिवसांचे असतात आणि त्यामध्ये स्वयंसेवकांना शारीरिक तसेच बौद्धिक प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग द्वितीय वर्ष मात्र पूर्वीप्रमाणेच नागपूर येथे घेतले जाते. या संपूर्ण प्रशिक्षण प्रक्रियेतून तयार झालेला स्वयंसेवक संघाच्या विविध जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी सक्षम आणि तयार होतो.

दरवर्षी नागपूरमध्ये होणारा कार्यकर्ता विकास वर्ग हा संघप्रेमींसाठी नेहमीच आकर्षणाचा विषय ठरतो. काही अपवाद वगळता हा वर्ग नियमितपणे दरवर्षी आयोजित केला जातो. १९४८ आणि १९७५ मधील संघबंदी तसेच कोरोना काळात हा वर्ग होऊ शकला नाही. १९७३ मध्ये संघ शिक्षा वर्ग अंतिम टप्प्यात असतानाच द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांचे निधन झाले होते. तसेच २००६ साली हा वर्ग सुरू असतानाच नागपूर येथील संघ मुख्यालयावर दहशतवाद्यांकडून हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटनाही घडली होती. पूर्वी कोणताही तरुण, मध्यमवयीन किंवा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेपासूनच शिस्त, शारीरिक बळकटी आणि बौद्धिक घडण यासाठी प्रशिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले. काळानुसार या रचनेत बदल होत गेले. अधिक सुव्यवस्थित प्रशिक्षण प्रक्रिया विकसित करण्यात आली. या प्रशिक्षणातून तयार होणारे स्वयंसेवक संघटनेच्या विविध जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडण्यासाठी तयार होतात.

ज्येष्ठ स्वयंसेवक संघ शिक्षा वर्ग करू शकत असे. मात्र आता १५ ते ४० वयोगटातील स्वयंसेवकांसाठीच हा वर्ग अधिकृतपणे मान्य केला जातो. तरीही चाळिशीपुढील इच्छुक स्वयंसेवकांना ६५ वर्षांपर्यंत या वर्गात सहभागी होता येते. अशा ज्येष्ठ स्वयंसेवकांसाठी दर दोन वर्षांनी दिवाळीनंतर हिवाळ्यात स्वतंत्र वर्ग आयोजित केला जातो. ज्येष्ठ स्वयंसेवकांचा द्वितीय वर्षाचा वर्ग देशभरात फक्त नागपूर येथेच घेतला जातो. या वर्षीचा कार्यकर्ता विकास प्रशिक्षण वर्ग (द्वितीय वर्ष) नेहमीप्रमाणे नागपूर येथेच आयोजित करण्यात आला होता. ११ मे २०२६ पासून डॉ. हेडगेवार स्मृती भवन परिसरात सुरू झालेल्या या वर्गात देशभरातून ८३२ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. या वर्गाचे सर्वाधिकारी म्हणून संघाचे पंजाब क्षेत्र अधिकारी सरदार महेंद्रसिंग माग्गो यांनी जबाबदारी सांभाळली.

तीन आठवडे चाललेल्या या प्रशिक्षणात शारीरिक शिक्षणासोबतच बौद्धिक उद्बोधनावरही भर देण्यात आला. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मांडलेल्या ''पंचपरिवर्तन'' संकल्पनेच्या अंमलबजावणीवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले तसेच त्यावर सविस्तर चर्चा झाली. या वर्गात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्ताजी होसबळे, सहसरकार्यवाह अतुल लिमये, अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य, माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी तसेच पश्चिम क्षेत्र प्रचारक सुमंत आमशेकर यांसह संघाच्या विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यकर्ता विकास प्रशिक्षण वर्ग द्वितीय वर्षाचा समारोप गुरुवार दि. ४ जून २०२६ रोजी रेशीमबाग मैदानावर पार पडला. यावेळी प्रशिक्षणार्थी स्वयंसेवकांनी शारीरिक प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ख्यातनाम उद्योजक पद्मभूषण कुमार मंगलम बिर्ला हे उपस्थित होते. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे देखील कार्यक्रमात उपस्थित होते. जगाला एका नव्या मार्गाची गरज आहे. तो मार्ग फक्त भारतच दाखवू शकतो असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी यावेळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना केले.

यासाठी वेळ आली आहे, मात्र ही वेळ आपोआप साधता येणार नाही. त्यासाठी तयार राहावे लागेल याकडेही त्यांनी लक्ष वेधले. सध्याच्या अमृतकाळात भारत विकसित राष्ट्र होण्याकडे वाटचाल करीत आहे. हा काळ भारतीय युवकांसाठी अभूतपूर्व संधी घेऊन आला आहे. या सुवर्णसंधीचा लाभ घेत देशाच्या सर्वांगीण विकासात युवकांनी मोलाचे योगदान द्यावे असे आवाहन उद्योजक पद्मभूषण कुमार मंगलम बिर्ला यांनी यावेळी बोलताना केले. गेल्या दहा वर्षांत भारताने अनेक क्षेत्रात शतकभराची प्रगती साधल्याने आज संपूर्ण जग भारताकडे आशेने आणि विश्वासाने पाहत आहे. याकडे लक्ष वेधत बिर्ला म्हणाले की, विविध आंतरराष्ट्रीय तज्ञही भारताच्या विकासाची दखल घेत असून येत्या काळात विकसित भारत जगासमोर आदर्श निर्माण करू शकेल. युवकांनी आता जे काही करायचे ते सर्व काही देशासाठीच करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक मान्यवर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्रशिक्षण वर्ग काल रात्री आटोपल्यावर आज प्रशिक्षणार्थी स्वयंसेवक आपापल्या गावी रवाना होत असलेले दिसून आले.

दुखणे जटिल दिलासा अपुरा



निवडणुकीच्या जाहीरनाम्यातील आश्वासन आणि अर्थसंकल्पातील घोषणांनंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. शेतकऱ्यांपुढील समस्यांचा डोंगर पाहता, त्यांना दिलासा देण्याची गरज होतीच. दोन लाख रुपयांपर्यंतची ही कर्जमाफी म्हणजे त्याच्या दुखण्यावरची मलमपट्टीच ठरेल. मात्र, तिजोरीची स्थिती पाहता हात किती मोकळे सोडायचे, याबाबत सरकारवरही मर्यादा होत्या. गेल्या वर्षी ही घोषणा केल्यानंतर प्रत्यक्ष मान्यता मिळण्यास मोठा विलंब झाला आहे. यापुढेही योजनेच्या पात्रतेचे निकष, अटी-शर्तींचे अडसर आणि अंमलबजावणीतील त्रुटी पाहता त्याचा लाभ कधी आणि किती शेतकऱ्यांना मिळेल, हाही मोठा प्रश्न आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या निर्णयाची अधिकृत घोषणा सरकारने केलेली नाही. सहकार विभागाकडून परिपत्रक आल्यावर नेमका तपशील समोर येईल. उपलब्ध माहितीनुसार ३० सप्टेंबर २०२५पर्यंतच्या थकीत पीककर्जापैकी दोन लाख रुपयांचे कर्ज 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने'अंतर्गत माफ होईल; तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

दोन वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. गेल्या वर्षी अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीने तडाखा दिला. सुमारे ७० लाख हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली, शेतकऱ्यांची घरेदारे वाहून गेली आणि लाखो हेक्टर सुपीक जमीनही खरवडून गेली. त्यामुळे गेला खरीप आणि रब्बी हंगामही शेतकऱ्यांच्या हातून गेला. त्यामुळे कर्जमाफीबाबत सरकारवरही मोठा दबाव होता. त्यासाठी समिती स्थापना आणि प्रत्यक्ष निर्णय यांत एक वर्ष निघून गेले. कर्जमाफी आणि प्रोत्साहन मदतीचा सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. राष्ट्रीयीकृत, सहकारी बँका आणि सोसायट्यांची कर्जेही त्यातून माफ होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्वीच स्पष्ट केले, हे बरे झाले. कर्जमाफी हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकमेव उपाय नसला, तरी तात्कालिक अडचणींतून बाहेर येण्यासाठी याची मदत होते. दुष्काळ-अतिवृष्टी अशा संकटांमुळे पीक हातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांना कर्जफेड शक्य होत नाही. अशा थकबाकीदार शेतकऱ्यांना नवे कर्ज मिळत नाही आणि पुढील हंगामात पेरणीसाठी बियाणे-खते किंवा औषधांचाही प्रश्न उभा राहतो.

अनेक शेतकरी मग सावकारांकडे धाव घेतात आणि दामदुपटीने फेड करूनही डोक्यावरील कजार्चा डोंगर कायम राहतो. अशा वेळी काही दुर्दैवी जीव आत्महत्येसारख्या मार्गाने जातात. कर्जफेडीद्वारे खाते मोकळे झाल्यावर तो पेरणी करून पुढील तजवीज करू शकेल. यंदाही 'एल निनो'मुळे अपुऱ्या पावसाचे अंदाज आहेत. त्यातच इराण युद्धामुळे विशेषतः युरियासारखी खते, बियाण्याची दरवाढ आणि मजुरीचा खर्चही वाढला असून, ट्रॅक्टरला डिझेल मिळवण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत. चहूबाजूंनी आलेल्या संकटांना तोंड देणाऱ्या शेतकऱ्याला या कर्जमाफीतून काहीसा दिलासा मिळेल. त्यावर आर्थिक तरतूद करून प्रत्यक्ष खाती मोकळी करणे आणि नव्याने पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्ज मिळेपर्यंत आणखी दोन महिन्यांचा विलंब होणार आहे. आत्ताच पेरणीच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना यंदाच्या खरिपात त्याचा लाभ कसा मिळणार, हादेखील मोठा प्रश्न आहे.

गांजलेल्या शेतकऱ्यांना दोन लाखांची मर्यादा न घालता 'सरसकट' कर्जमाफी मिळावी, त्याचा सातबारा कोरा करावा, अशा शेतकरी नेत्यांच्या मागण्या होत्या. राज्याची आर्थिक स्थिती पाहता सरकार ते मान्य करण्याची शक्यता नव्हती. राज्यावरील

आंबटगोड खिचडी

◆ **साहित्य :** १ वाटी तांदूळ, १ वाटी तुरीची किंवा मुगाची डाळ, १ अख्खं लिंबू, २ हिरव्या मिरच्या, १ चमचाभर जिरं, पाव चमचा हिंग, पाव चमचा हळद, जरासं तेल, चवीनुसार मीठ आणि जरा गोडसर चव येईल तेवढे गूळ किंवा साखर, आधणाचं गरम पाणी ४ वाट्या.

◆ **पाककृती :** डाळ + तांदूळ पाण्यात १०-१५ मिनिटं भिजत घालावेत, नंतर दोन-तीन पाण्यातून धुऊन, पाणी निथळून फोडणीत पडण्याकरता तयार ठेवावेत. कूकर गरम करत ठेवावा आणि जरासं तेल घालून चमचाभर जिऱ्याची फोडणी करावी. ते फुललं की जरासं हिंग घालावं आणि ते फसफसलं की मिरच्यांचे हातानेच मोडून मोठे तुकडे टाकावेत. वर डाळ, तांदूळ आणि हळद घालून मिनिटभर परतावं आणि उकळीचं पाणी घालून नेहमी प्रमाणे खिचडी शिजवून घ्यावी. कूकरचं प्रेशर पडून तो उघडला की खिचडी बुडेल इतकं गरम पाणी परत घालावं आणि गरम करत ठेवावे. यात आता एका संपूर्ण लिंबाचा रस, मीठ आणि साखर घालून चांगले घोटून, ढवळून रटरटू द्यावे. पाच-एक मिनिटांनंतर आच घालवून अगदी गरमच वाढावी. वर साजूक तूप चांगले मोठा चमचाभर घालायला विसरायचं नाही. हवी असेल तर वाढतेवेळी बारीक चिरलेली थोडी कोथिंबीर वर पेरावी. ताज्या कोथिंबिरीचा स्वाद चांगला लागतो आणि खिचडीचा हलका पिवळा अन् कोथिंबिरीचा हिरवागार रंग दिसायलाही छान दिसतो.



कम्फर्ट व्हर्सेस फॅशन, दोन्ही कसे मिळवाल?

'आरामदायीपणा सर्वात महत्त्वाचा' हे सर्वश्रुत आहे, परंतु जेव्हा स्त्रियांच्या फॅशनचा विषय येतो, तेव्हा एखादी गोष्ट निवडताना केवळ या एकाच गोष्टीचा विचार करून चालत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ॲथलेअरचा ट्रेंड वाढत असताना, स्त्रिया दोन्ही गोष्टी मिळवून देण्याची १०० टक्के शक्यता असल्याचे सिद्ध करत फॅशनविरुद्ध कम्फर्ट असे वादविवादाचे अनेक मार्ग शोधत आहेत. जेव्हा त्या आरामदायी हा शब्द ऐकतात तेव्हा, त्यामध्ये लेगिंग्ज आणि घाम नेहमीच प्रथम गोष्टी असतात, परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो, तेव्हा, फॅशनचे समर्थक निःसंशयपणे अधिक सर्जनशील होतात.



आपण २१ व्या शतकात वास्तव्य करत आहोत, जेथे स्त्रिया सतत समाजात मिसळत असतात, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनशैली आहेत आणि ही वेळ आपण आपल्या कपड्यांसह अधिक आरामदायक आणि फॅशनेबल निवड करण्याची. चांगली बातमी अशी आहे की, अलीकडच्या काळात लाऊंजवेअर खूप वर्षांनी आले आहेत. केवळ त्यामध्ये भरपूर पर्याय म्हणून नाहीत तर ते सैल, आरामदायी असे कपडे खरोखरच ट्रेंडमध्ये आहेत. आता आपल्या मैत्रिणींसह दिवसातून जास्तीत जास्त वेळा बाहेर फिरायला जाऊ शकता, तुम्ही आरामदायी वाटू शकेल ते ही विशेष काही न बदलता. जर आपण त्यांना 'जॉगर्स' म्हटले तर, तुम्ही त्यांना धावपट्टीवर स्वेटपॅन्टस म्हणून देखील घालू शकता. आपण ड्रेसिंगच्या सुवर्णयुगात राहत आहोत - एका आळशी मुलाचे फॅशन स्वर्ग.



म्हणून, व्हिस्कोस त्याच्या गुणधर्मांसह उच्च श्वासोच्छ्वास, संपूर्ण जैव-विकृती आणि पर्यावरण अनुकूल अशा श्रेणीतील पसंतीची निवड ठरली आहे. व्हिस्कोसपासून बनवलेल्या कपड्यांचे हे सॉफ्ट टेक्स्चर आहे, ज्यामुळे त्यांना सहजपणे पोशाख करणे सोपे होते आणि आपल्याला पाहिजे असलेल्या शैलीत वापरणे सोपे होते. फॅब्रिकची फ्लुएडीटी शरीरावर ड्रेप करण्यास अधिक मदत करते, त्यामुळे फॅब्रिक अंगावर चमकण्यास मदत होते.

कपड्यांसह लेअरिंग अत्यंत सोपे आहे, कारण याचा पोत कपड्याचा गोळा होऊ देत नाही. हे कोणत्याही फॅशनिस्टांसाठी असणे आवश्यक आहे. उज्ज्वल रंग आणि पेस्टल्स रंग ट्रेन्डमध्ये आहेत, त्यामुळे फॅब्रिकची रंगीत होणारी क्षमता आकर्षक बनवते.

जेवल्यानंतर कधीच खाऊ नका 'या' गोष्टी, आरोग्यास होईल नुकसान

बदलत्या जीवनशैलीनुसार खाण्या-पिण्याच्या पद्धतीत सुद्धा बदल झाला आहे. तर काही जणांना जेवल्यानंतर लगेच झोप येणे, थोड्या वेळाने पुन्हा भूक लागल्याने खाणे अशा विविध सवयी असतात. मात्र या सवयी तुमच्या आरोग्याला धोका पोहोचवू शकतात. हे खरं आहे, कारण जेवल्यानंतर काही गोष्टी खाऊ नयेत किंवा करू नयेत, असा सल्ला दिला जातो. त्यामुळे तुम्हाला सुद्धा जेवल्यानंतर खाणे किंवा झोपण्याची सवय असल्यास ती आजच बदला. याचा फायदा तुम्हाला नक्की होईल.

सकाळचा नाश्ता पोटभरून करायचा, दुपारचे जेवण मध्यम आणि रात्रीचे जेवण अगदी कमी करावे, असे सांगितले जाते. कारण दिवसभरातील आपण ज्या गोष्टी खातो त्या पचण्यास काही काळ लागत असून ते नीट न पचल्यास विविध समस्या उद्भवतात. मात्र जर तुम्हाला जेवणानंतर काही गोष्टी करण्याची सवय असल्यास तर आधीच सावध व्हा, नाहीतर आरोग्यास नुकसान होईल.

◆ जेवल्यानंतर चहा पिण्याची सवय टाळा. कारण यामुळे जेवलेले अन्न पचण्यासाठी समस्या येते. जेवणाच्या एक तास आधी किंवा एक तासानंतर चहा किंवा कॉफी न पिण्याचा डॉक्टरांकडून सल्ला दिला जातो. या सवयीमुळे ॲनिमिया होण्याची शक्यता असते.



◆ फळ उपाशीपोटी खाणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. मात्र सकाळचा पोटभर नाश्ता केल्यानंतर फळ खाणे टाळा. कारण नाश्त्यानंतर फळ खाल्ल्यास ते पचण्यास समस्या येईल. फळांचे सेवन तुम्ही संध्याकाळी केले तरी त्याचा धोका उद्भवत नाही.

◆ पचनासाठी पाणी हा उत्तम उपाय आहे. परंतु जेवल्यावर लगेच पाणी पिऊ नका. खासकरून थंड पाणी पिणे टाळा. त्यामुळे पचनक्रिया धिम्या गतीने होते. त्यामुळे जेवल्यानंतर या करू नका. तसेच सिगारेट पिणे, दारू पिणे या सवयी सुद्धा जेवल्यानंतर केल्यास आरोग्यास धोकादायक ठरू शकतात. तर काही जण जेवण झाल्यानंतर आणि झोपण्यापूर्वी अंघोळ करतात. पण ही सवय वाईट असून त्यामुळे शरीरातील रक्तपुरवठा सुरळीत सुरू राहण्यास अडथळा निर्माण होतो.

व्हॉट्सॲप लवकरच एक नवीन फीचर सादर करू शकतं, ज्यामुळे तुम्ही सहज एआय स्टिकर जनरेट करू शकाल. हे फीचर कसं वापरायचं चला जाणून घेऊया. सध्या हे फीचर बीटा टेस्टिंगसाठी उपलब्ध आहे. इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप बीटानं आपल्या प्लॅटफॉर्मवर एआय स्टिकरचा सपोर्ट ॲड केला आहे. व्हॉट्सॲपवर हे पहिलं फीचर आहे, जे आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा वापर करेल आणि एआय स्टिकर बनवण्यास मदत करेल.

तुमच्या हातातील व्हॉट्सॲपमध्ये आता एआयचा शिरकाव; तुम्ही म्हणाल तसे स्टिकर्स बनवून देणार

एआय स्टिकर बनवण्याचा पर्याय फक्त अँड्रॉइड २.२३.१७.१४ अपडेटमध्ये उपलब्ध आहे, ज्याचा वापर फक्त काही निवडक व्हॉट्सॲप बीटा युजर्सच करू शकतात. ही नवीन सर्व्हिस युजर्सना पर्सनलाइज्ड स्टिकर्स बनवण्यास मदत करेल. पुढील काही दिवसांमध्ये हे फीचर सर्व युजर्ससाठी जगभरात रोलआऊट केलं जाऊ शकतं. या फीचरबाबत WABetaInfoनं आपल्या रिपोर्टमध्ये सांगितलं आहे की, नवीन अपडेटमधून आलेलं हे फीचर सध्या मर्यादित टेस्टर्ससाठी उपलब्ध झालं आहे. इतर स्टिकरप्रमाणे, एआय-जनरेटेड स्टिकर देखील स्टिकर टॅबमध्ये ठेवण्यात आले आहेत. स्टिकर जेनरेट करण्यासाठी युजर्सना नवीन क्रिएट बटनवर टॅप करावं लागेल.



◆ व्हॉट्सॲप चॅटमध्ये, स्टिकर विंडो ओपन करण्यासाठी खाली दिलेल्या स्माईली आयकॉनवर टॅप करा.

◆ जेव्हा तुम्हाला हा अपडेट मिळेल, तेव्हा एक पर्याय देण्यात येईल जेनरेट युअर ओन एआय स्टिकरवर टॅप करा.

◆ हे फीचर कधीपर्यंत युजर्ससाठी उपलब्ध होईल, यासाठी व्हॉट्सॲपनं सध्या कोणतीही टाइमलाइन दिली नाही. तसेच मेटानं या जेनरेटिव्ह एआयचं नाव देखील सांगितलेलं नाही, ज्याच्या मदतीनं हे स्टिकर्स बनवले जातील. आताही कंपनीनं स्वतः तयार केलेली एआय टेक्नॉलॉजी आहे की इतर कोणत्या टेक कंपनीशी मेटानं हातमिळवणी केली आहे, ते पाहावं लागेल. तसेच हे स्टिकर्स जेनरेट करताना काही मर्यादा असतील की नाही ते देखील फीचर सर्वांसाठी उपलब्ध झाल्यावरच समजेल.

थकवा दूर करण्यासाठी ग्रीन टी फेसपॅक

चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी घरगुती फेसपॅक सर्वोत्तम ठरतो. जेव्हा स्कीन थकलेली किंवा डल वाटत असेल तेव्हा तांदूळ आणि ग्रीन टीचा घरी तयार केलेला फेसपॅक स्किनला रिलॅक्स होण्यास मदत करेल. बघू कसा तयार करायचा हा पॅक...

◆ **सामग्री :** लिंबू, ग्रीन टी, २-३ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेल.

◆ **कृती :** एका वाडग्यात २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात १/४ चमचा लिंबाचा रस मिसळा. त्यात ताजी ग्रीन टी मिसळा. क्रीमसारखं होईपर्यंत मिसळत राहा. आता या पॅकमध्ये ३ ते ४ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेलाचे मिसळा.

◆ **लावण्याचा विधी :** आपला चेहरा कोमट पाण्याने धुऊन घ्या. मग



चेहरा आणि मानेवर पॅक लावा. २० मिनिटानंतर पॅक धुऊन टाका. चेहरा पुसून मॉइश्चरायझर लावा.

महत्त्वाचा कानमंत्र

• बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.

• तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत.



यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.

• फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.

• सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.

• केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.

• केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

रंगाला अनुसरून करा मेकअप



गोऱ्या रंगासाठी :

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.



गडद रंगाच्या त्वचेसाठी :

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, करॅमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

पिवळ्या रंगाची त्वचा :

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

गव्हाळ त्वचेसाठी :

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण

काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे –

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

डेंग्यू आघाताचे सिंड्रोम–

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता जाणवते



खाल्ल्या मिठाचे परिणाम

खाल्ल्या मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर



असते. मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.

व्यायामाचेही व्यसन नको

शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.



एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते. परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

आपण अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...

पचनाचे विकार –

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वारंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.



किडनीचे विकार –

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

सांधेदुखी –

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

अंधेरीतील चार हॉटेल आणि बारवर बीएमसीकडून तोडक आणि जप्तीची कारवाई

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

दिल्ली येथे नुकत्याच घडलेल्या दुदैर्वी हॉटेल आग दुर्घटनेने अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिक, पर्यटक तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देत मुंबईतील सर्व उपाहारगृह परिसरातील अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षण यंत्रणा कायमस्वरुपी सुस्थितीत व कार्यरत ठेवाव्यात, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. तसेच, ०६ ते २० जून २०२६ या कालावधीदरम्यान मुंबई अग्निशमन दलाकडून विविध विभागांच्या सहकार्यानें विशेष संयुक्त तपासणी मोहीम आयोजित करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.



अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी याबाबत सांगितले की, महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम - २००६ नुसार, सर्व अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षण यंत्रणा कायमस्वरूपी सुस्थितीत व कार्यरत ठेवणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने, मुंबईतील सर्व उपाहारगृहे परिसरात स्थापित अग्निशामक यंत्रे, स्प्रिंकलर प्रणाली, अग्निसूचना व शोध प्रणाली, किचन डक्टिंग व्यवस्था, हायड्रंट प्रणाली तसेच आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचे मार्ग आदी सर्व अग्निसुरक्षा यंत्रणा २४ तास कार्यरत, सुरक्षित व कोणत्याही अडथळ्याविना उपलब्ध ठेवाव्यात. तसेच, अग्निसुरक्षा यंत्रणांची वर्षातून दोन वेळा (जानेवारी व जुलै महिन्यात) शासनमान्य परवानाधारक संस्थेमार्फत तपासणी करून घेणे अनिवार्य आहे. सदर तपासणीनंतर प्राप्त होणारे अनुपालन प्रमाणपत्र अर्थात 'फॉर्म-बी' कोणताही विलंब न करता नियमितपणे मुंबई अग्निशमन दलाकडे सादर करावा, असे निर्देश देखील जोशी यांनी दिले आहेत.

अग्निशमन अधिकारी रविंद्र आंबुलगेकर यांच्या नेतृत्वात मुंबईत अग्निशमनविषयक विविध उपाययोजना केल्या जातात. याच पार्श्वभूमीवर, उपाहारगृहांसाठी निर्देश जारी करण्यात आले आहेत. तसेच, विशेष संयुक्त तपासणी मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, ०६ ते २० जून २०२६ या कालावधीदरम्यान मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या सहकार्यानें मुंबई अग्निशमन दलाकडून विशेष संयुक्त तपासणी मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेत, बृहन्मुंबई क्षेत्रातील (मुंबई शहर आणि उपनगरे) मॉल, तारांकित निवासी हॉटेल, लॉजिंग-बोर्डिंग, पार्टी हॉल, बँक्वेट हॉल, रुफ टॉप, पब, नाईट क्लब, रेस्टॉरंट व बार, ऑर्केस्ट्रा बार, जिमखाना तसेच अन्य ठिकाणांची अग्निसुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करण्यात येईल. ही मोहीम या कालावधीनंतरही नियमितपणे सुरू राहील, असेही जोशी यांनी सांगितले.

अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक उत्तरदायित्व देखील आहे. त्यामुळे, अग्निसुरक्षेबाबत कोणतीही तडजोड न करता निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुंबई अग्निशमन दलाकडून सर्व उपाहारगृह मालक, व्यवस्थापक व संबंधित घटकांना करण्यात येत आहे.

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या निदेर्शानुसार, उपआयुक्त (परिमंडळ-४) डॉ. भाग्यश्री कापसे यांच्या मार्गदर्शनात आणि सहायक आयुक्त (के पश्चिम विभाग) चक्रपाणी अल्ले यांच्या नेतृत्वात प्रशासकीय विभाग (वॉर्ड) सार्वजनिक आरोग्य विभाग, अनुज्ञापन विभाग, इमारत व कारखाना विभाग आणि मुंबई अग्निशमन दल यांच्या संयुक्त पथकाद्वारे अंधेरी (पश्चिम) येथील वॉकमन बार, बोरा बोरा, चायना गेट, कारवन सेराई व होमटाऊन या हॉटेल आणि बारवर कारवाई करण्यात आली. नियमांनुसार राखीव असलेल्या अनिवार्य खुल्या जागेचा वापर या आस्थापनांकडून स्वयंपाकघर व सेवा क्षेत्रासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर खुल्या जागेवरील अनधिकृत आच्छादन व बांधकाम निष्कासित करण्यात आले. तसेच, १७ व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर, १ नायट्रोजन गॅस सिलिंडर, १ गॅस बँक, ४ कुकिंग रेंज तसेच मायक्रोवेव्ह ओव्हन जप्त करण्यात आले.

नीट पेपरफुटीचे धागेदोरे कल्याणपर्यंत म्हारळमधील विद्यार्थिनीची सीबीआय चौकशी



■कल्याण। प्रतिनिधी,

नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे कल्याणपर्यंत पोहोचले असून या प्रकरणी सीबीआयने नुकतीच म्हारळ परिसरात राहणाऱ्या एका विद्यार्थिनीची चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पेपरफुटीचा तपास करर्णाया सीबीआयच्या विशेष पथकाने संबंधित विद्यार्थिनीच्या घरी भेट देत तिचा जबाब नोंदवला आहे. तपासात आधीपासूनच संशयितांच्या यादीत असलेल्या एका विद्यार्थ्याच्या कॉल डिटेल्समधून या विद्यार्थिनीचा मोबाईल क्रमांक सीबीआयला मिळाल्याचे म्हटले जात आहे. या संपर्काच्या आधारे कल्याणमध्ये दाखल होत सीबीआयच्या पथकाने या विद्यार्थिनीची सखोल चौकशी केली. पेपरफुटी प्रकरणात संबंधित विद्यार्थिनीचा थेट सहभाग असल्याचे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थिनी आणि संशयित विद्यार्थी यांच्यातील संपर्काचे स्वरूप काय होते तसेच त्याचा पेपरफुटी प्रकरणाशी त्यांचा काही संबंध आहे का, याचा तपास सीबीआय करत आहे. या संदर्भात विद्यार्थिनीच्या वडिलांशी संपर्क साधला असता त्यांनी अधिक माहिती देण्यास नकार दिला. मात्र, त्यांच्या मुलीचा एका विद्यार्थ्यासीबत संपर्क होता आणि त्याच कारणामुळे तिचा मोबाईल क्रमांक तपास यंत्रणांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. सीबीआय अधिकार्यांनी घरी येऊन प्राथमिक चौकशी केल्याची माहितीही त्यांनी दिली.

पुण्यात गोळीबार झाल्याने एकच खळबळ
आरोपी ऊसात पळून गेले, पोलिसांकडून शोध सुरु

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यातील दौंड तालुक्यातील पाटस येथे गोळीबार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. चारचाकी वाहन पार्किंग करताना झालेल्या वादातून हा गोळीबार करण्यात आला. यातील 2 संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून अन्य 2 आरोपी ऊसात पळून गेले आहेत. त्यांचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील काष्टीमधील काही तरुण आणि पाटसच्या तरुणांमध्ये भर दुपारी उन्हात वाद झाला, या हाणामारीत गावठी पिस्तूलमधून 3 ते 4 राऊंड फायर करण्यात आल्याची माहिती आहे. सुदैवाने यात जीवितहानी झाली नसून दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. तर अन्य काही आरोपी ऊसात पळून गेले असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून रिकामी काडतुसे जप्त केली आहेत. मिळत असलेल्या माहितीनुसार, पाटस येथील गडदरे कॉम्प्लेक्स समोर ही घटना घडली आहे. काष्टी येथील काही गुंड प्रवृत्तीचे तरुण गडदडे कॉम्प्लेक्स समोर आले होते. त्यांची पाटस येथील काही तरुणांशी शाब्दिक बाचाबाची झाली.



पुढे हा वाद वाढत गेला, दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर दोन्ही गटातील काही तरुणांनी गावठी पिस्तूल काढून हवेत गोळीबार केला. यात 3 ते 4 राऊंड फायर झाल्याची माहिती समोर येत आहे. गोळीबाराची माहिती मिळताच यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख आणि पाटस पोलीस घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी काही संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, हा गोळीबार नेमका कोणत्या कारणातुन झाला ? कोणत्या पिस्तूलमधून फायर करण्यात आला आणि यामध्ये कोण जखमी झाले आहे का? याबत पोलिसांकडून अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही. यवत पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

निदा खान प्रकरणाचा तपास खोलात... माजी खासदार एसआयटीच्या रडारवर



इम्तियाज जलील एसआयटीच्या रडारवर?

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मतीन पटेल यांच्या जप्त करण्यात आलेल्या मोबाईलमधील कॉल रेकॉर्ड, चॅट्स आणि अन्य डिजिटल माहितीची तपासणी सुरू आहे. याच डेटाच्या आधारे तपास यंत्रणांना काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाल्याची चर्चा असून, या प्रकरणात एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांचे नावही चर्चेत आले आहे. एसआयटीकडून त्यांना चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरी याबाबत अधिकृत पुष्टी झालेली नाही. दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात मुख्य दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तपासादरम्यान मिळालेल्या नव्या तांत्रिक पुराव्यांच्या आधारे लवकरच पुरवणी दोषारोपपत्रही दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे तपासात आणखी काही धक्कादायक खुलासे समोर येण्याची चर्चा सुरू झाली आहे.

■नागपूर । प्रतिनिधी,

राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या नाशिकमधील टीसीएस लैंगिक छळ आणि कथित सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात आता नवे धागेदोरे समोर येत असून तपासाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याच्या आरोपावरून एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांची विशेष तपास पथकाने आतापर्यंत तब्बल तीन वेळा कसून चौकशी केली आहे. या चौकशीमुळे आता राजकीय वतुर्ळातही मोठी खळबळ उडाली आहे.

मतीन पटेलने आरोप फेटाळले

दुसरीकडे, निदा खानला राहण्यासाठी घर मिळवून दिल्याच्या आरोपावरून अडचणीत आलेले नगरसेवक मतीन पटेल यांनी मात्र सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, ''निदा खानला मी याआधी कधी भेटलो नव्हतो. तिचे आई-वडील कौटुंबिक अडचणीचे कारण सांगत मदतीसाठी माज्याकडे आले होते. ती गर्भवती असल्याने मानवी दृष्टिकोनातून मी तिला राहण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. यामध्ये कोणताही चुकीचा हेतू नव्हता.''

इम्तियाज जलील यांचे नाव या प्रकरणात जोडले जात असल्याच्या चर्चेवरही पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. ''इम्तियाज जलील हे माझे राजकीय नेते आहेत. आमच्यातील फोनवरील चर्चा राजकीय आणि वैयक्तिक विषयांपुरतीच मर्यादित होती. निदा खान प्रकरणात त्यांचा कोणताही संबंध नाही. माज्या मोबाईलचे सर्व तपशील पोलिसांकडे उपलब्ध आहेत,'' असा दावा त्यांनी केला.

मात्र, एसआयटीच्या हाती लागलेल्या तांत्रिक पुराव्यांमुळे या प्रकरणाची दिशा आता कोणत्या वळणावर जाते, तसेच पुढील चौकशीत आणखी कोणती मोठी नावे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यभरात गाजत असलेल्या या प्रकरणात पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रेयसीच्या नादी लागला, सोन्यासारख्या पत्नीला पावडर खाऊ घातली... भयंकर प्रकरण!

■मुंबई। प्रतिनिधी,

एका नराधम पतीने आपल्या प्रेयसीच्या संगनमताने स्वतःच्या पत्नीची अत्यंत क्रूरपणे हत्या केली आहे. 24 मे रोजी एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती, तिची ओळख रेवती नगरातील प्रीती देवी (२२) अशी पटली. या प्रकरणी पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फियार्दीवरून पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि अखेर शुक्रवारी पतीसह त्याच्या प्रेयसीला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपींच्या निर्दयी कृत्याबद्दल सर्व स्तरातून संताप व्यक्त होत आहे.

मृतदेह झुडपात फेकून दिला

चौकशीदरम्यान प्रेयसी शोभाने केलेल्या खुलासामुळे या हत्याकांडाचा भीषण कट समोर आला आहे. चुन्नीलालच्या सांगण्यावरून 22 मे रोजी सकाळी 9 वाजता शोभाने प्रीतीला फिरायला जाण्याच्या बहाण्याने घराबाहेर बोलावले. चुन्नीलालने शोभाला एक संशयास्पद पावडरचे पाकीट दिले होते, जे तिने प्रीतीला पाण्यासोबत पाजले. यामुळे प्रीती काही वेळातच शुद्ध हरपली. त्यानंतर ई-रिक्शाने तिला बायासी पुलाकडे नेले, जिथे आधीच तयारीत असलेल्या चुन्नीलालने तिला बाईकवर मधोमध बसवले. त्यानंतर पुलाच्या पलीकडे एका निर्जन ठिकाणी नेऊन त्यांनी प्रीतीचा गळा आवळून तिची निर्घृण हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह झुडपात फेकून दिला.

पतीस प्रेयसीला ठोकल्या बेड्या

मृतक तरुणीचे वडील श्याम देव यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रीतीचा विवाह 6 मार्च 2025 रोजी चुन्नीलाल प्रजापती याच्याशी झाला होता. लग्नानंतर अवघ्या काही दिवसांतच हुंड्यासाठी प्रीतीचा सासरच्या मंडळींकडून छळ सुरू झाला आणि तिला मारहाण केली जाऊ लागली. 22 मे रोजी प्रीती अचानक बेपत्ता झाल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. श्याम देव यांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी सुरुवातीला 8 जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले होते. या प्रकरणाचा सखोल तपास करत असतानाच पोलिसांना धक्कादायक धागेदोरे हाती लागले आणि पती चुन्नीलाल प्रजापती (25) व त्याची प्रेयसी शोभा चौरसिया (21) यांच्यावर संशय बळावला.

या अमानुष हत्येनंतर आरोपींनी मृतदेह झुडपात लपवून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांच्या चौकशीत त्यांचे बिंग फुटले. पतीने आपल्या प्रेयसीच्या मदतीने केलेल्या या कटकारस्थानामुळे प्रीतीचे संपूर्ण कुटुंब उध्वस्त झाले आहे. पोलिसांनी आता चुन्नीलाल प्रजापती आणि शोभा चौरसिया या दोघांनाही अटक केली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. हुंड्यासाठी स्वतःच्या पत्नीचा बळी घेणाऱ्या या नराधम पतीच्या आणि त्याच्या प्रेयसीच्या या कृत्यामुळे बलिया परिसरातील नागरिक संतापले असून, आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी करत आहेत. पोलीस आता या प्रकरणाशी संबंधित इतर संशयितांचाही कसून तपास करत आहेत. ही घटना उत्तर प्रदेशमधील बलिया जिल्ह्यातून समोर आली आहे.



बायकोच्या अनैतिक संबंधांना वैतागला, 6 मिनीटांचा व्हिडीओ रेकॉर्ड केला अन्...

■सोलापूर। प्रतिनिधी,

सोलापूर शहरातून एक अत्यंत दुदैर्वी आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादातून आणि पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाला कंटाळून एका 38 वर्षीय विवाहित पुरुषाने जीवन संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला आहे. जाकीर अब्दुल्ल रज्जाक पटेल असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

पत्नीसाठी 6 मिनिटांचा व्हिडिओ बनवून पतीची आत्महत्या

धक्कादायक बाब म्हणजे, आत्महत्या करण्यापूर्वी जाकीर पटेल यांनी आपल्या पत्नीच्या नावे तब्बल सहा मिनिटांचा एक व्हिडिओ संदेश रेकॉर्ड केला होता, ज्यामध्ये त्यांनी आपल्या मनातील वेदना आणि आत्महत्येसाठी कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा उलगडा केला आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर सोलापूर परिसरात मोठी खळबळ उडाली असून, मृताच्या नातेवाईकांनी पत्नीवर आणि तिच्या संबंधित व्यक्तीवर गंभीर आरोप केले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. जाकीर पटेल यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, त्यांनी रेकॉर्ड केलेला तो सहा मिनिटांचा व्हिडिओ पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या व्हिडिओच्या आधारे तसेच नातेवाईकांनी केलेल्या आरोपांच्या अनुषंगाने पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. या दुदैर्वी घटनेमुळे सोलापूर शहरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलीस तपासात नेमके काय सत्य समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मृताच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.



पत्नीच्या विवाहबाह्य संबंधांना वैतागला

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास जाकीर पटेल यांनी आपल्या घरातील सिलिंग फॅनला गळफास घेऊन आपले आयुष्य संपवले. मृताच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, जाकीर यांना त्यांच्या पत्नीचे एका अनोळखी व्यक्तीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचा दाट संशय होता. याच विषयावरून पती-पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार खटके उडत होते आणि मोठे वाद होत होते. नातेवाईकांचा असा आरोप आहे की, पत्नीच्या संशयास्पद संबंधातील संबंधित व्यक्तीने जाकीर पटेल यांना सर्वांसमक्ष चापट मारून अपमानित केले होते, ज्यामुळे ते प्रचंड मानसिक तणावाखाली होते. झालेला अपमान आणि सततच्या कौटुंबिक तणावामुळे जाकीर पटेल मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचले होते. पत्नीशी असलेल्या वादातून त्यांना झालेला त्रास आणि अपमान त्यांना सहन झाली नाही, म्हणूनच त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले, असा दावा त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. जाकीर यांनी आत्महत्येपूर्वी तयार केलेला सहा मिनिटांचा व्हिडिओ त्यांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांच्या हाती लागला आणि त्यातील मजकूर ऐकून सर्वांनाच मोठा धक्का बसला. या व्हिडिओमध्ये त्यांनी आपल्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या परिस्थितीबद्दल सविस्तर माहिती दिली असल्याचे समजते, ज्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.

भाऊ गेला अन् दिरांनी वहिनीला एकटं गाठलं, मग...

■मुंबई। प्रतिनिधी,

एका विधवा महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पीडित महिलेने तिच्या नात्यातील दोन दिरांवर वेगवेगळ्या वेळी बलात्कार केल्याचा गंभीर आरोप केला आहे. महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवून या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. छत्तीसगडमधील गौरेला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ही घटना आहे.

दोन दिरांनी केले अत्याचार

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेच्या पतीचे सुमारे 10 वर्षांपूर्वी निधन झाले होते. पतीच्या निधनानंतर ती एकटीच राहत होती. या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन तिच्या नात्यात लागणाऱ्या दोन वेगवेगळ्या दिरांनी वेगवेगळ्या प्रसंगी तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडितेने या घटनेविरोधात आवाज उठवत गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला, मात्र सुरुवातीला तिला यश आले नाही. पहिल्या तक्रारीनंतर महिला काही काळासाठी बाहेर गावी गेली होती, ज्यामुळे पोलीस तिच्याशी संपर्क साधू शकले नव्हते. मात्र, ती परत आल्यानंतर पोलिसांनी पुढील कारवाई सुरू केली.

दोन स्वतंत्र गुन्हे दाखल

महिलेची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी दोन्ही प्रकरणांत स्वतंत्र एफआयआर नोंदवले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, दोन्ही घटनांचा तपास वेगवेगळ्या पातळीवर केला जात असून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे. पोलीस ठाण्याचे प्रभारी शनिप रात्रे यांनी या घटनेला दुजोरा दिला असून, पीडितेच्या तक्रारीवरून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आल्याचे सांगितले. यातील पहिल्या प्रकरणात एका आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, दुसऱ्या प्रकरणातही कायदेशीर प्रक्रियेनुसार कारवाई केली जात आहे.

फरार दिरांचा शोध सुरु.

पोलीस ठाणे प्रभारींनी सांगितले की, दोन्ही गुन्हे दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेणे सुरु केले आहे. आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांची पथके सातत्याने ठिकठिकाणी छापे टाकत आहेत. दोन्ही आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. सध्या पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत असून, पीडितेचा जबाब आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जात आहे.



14 वर्षीय मुलीवर 20 दिवस कुलूपबंद घरात नको तेच...

■मुंबई। प्रतिनिधी,

शाळेत जाणाऱ्या एका 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर तब्बल 20 दिवस सामहिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्राकर उघडकीस आला. संबंधित प्रकरणात तिच्या कुटुंबीयांनी आरोप केला की, तीन तरुणांनी तिचे अपहरण करत नंतर पीडितेला ओलीस ठेवलेत. पोलिसांपासून बचाव व्हावा यासाठी ते सतत जागा बदलत होते. सुरक्षित जागेच्या शोधात असताना, एका तरुणाच्या कुलूपबंद घरात तिला ठेवण्यात आले होते, मात्र तपासादरम्यान ती सापडलीच. ही घटना उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील आहे.

नेमकं काय घडलं?

सोमवारी, पोलिसांच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेतला आणि दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. कुटुंबीयांचा असा आरोप की, पोलीस हे प्रकरण मिटवण्यासाठी सातत्याने त्यांच्यावर दबाव आणण्याचे काम करत आहेत. विद्यार्थिनीच्या आईने सांगितलं की, पोलिसांनी मिळून विद्यार्थिनीला धमकावले होते, नंतर तिच्याकडून स्वतःच्या विरोधात व्हिडिओ बनवला आणि नंतर पोलिसांच्या गाडीत टाकून नेले.

मुलगी सायंकाळपर्यंत घरी परतलीच नाही

चौबेपूर पोलीस ठाणे परिसरातील गावात अल्पवयीन मुलगी ही 11 मे रोजी संशयास्पदपणे बेपत्ता झाली. शाळेत गेलेली मुलगी सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने, तिच्या आईने तिचा शोध सुरू केला, कुटुंबीय व इतर नातेवाईकांना याबाबतची माहिती मिळाली होती. पीडित विद्यार्थिनी बरेच दिवस होऊन गेले तरीही परतली नाही, तेव्हा या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

महिलेनं सांगितलं की, नवऱ्याचे आधीच निधन झाले होते, नंतर मुलगी बेपत्ता झाली होती. तिने तिच्या सर्व नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र त्या मुलीचा कुठेही शोध लागला नाही. तिला काही लोकांवर अधिक संशय होता आणि तिने पोलिसांना त्यांची नावे दिली होती, पण पोलिसांनी त्याकडे फार लक्ष दिले नाही.

या प्रकरणात आईचा असा आरोप की, पोलीस संबंधित प्रकरण मिटवण्यासाठी त्यांच्यावर सातत्याने दबाव आणत होते. पोलिसांनी वैद्यकीय तपासणी केली असून संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com